THE YASH ACADEMY™

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा

## पेपर क्रमांक – 2

## SUBJECTWISE QUESTION SET

## 2017

**Address :**

**3rd Floor, Moonlight Building, Opp.**

**Sitabuldi Police Station, Sitabuldi Nagpur**

**Mob. 7447777799 / 8381077258 / 07122956053**

## पोलीस उपनिरीक्षक, गट - ब (अराजपत्रित) मुख्य परीक्षा

### अभ्यासक्रम -SYLLABUS

**पेपर क्रमांक - 1 मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

**मराठी :-** सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाकप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.

**इंग्रजी :-** Common Vocabulary, Sentence structure, Grammer, use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.

**सामान्य ज्ञान:-**

1. **चालू घडामोडी - जागतिक तसेच भारतातील**

2. **माहिती अधिकार अधिनियम - 2005, व महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, 2015**

3. **संगणक व माहिती तंत्रज्ञान -** आधुनिक समाजातील संगणकाची भूमिका, वेगवेगळ्या क्षेत्रातील जीवनात संगणकाचा वापर, डाटा कम्युनिकेशन, नेटवर्कींग आणि वेब टेक्नॉलॉजी, सायबर गुन्हे व त्यावरील प्रतिबंध, नवीन उद्योग म्हणून माहिती तंत्रज्ञानाचा निरनिराळ्या सेवा सुविधांची माहिती मिळण्यासाठी होणारा उपयोग, भारतातील माहिती तंत्रज्ञान उद्योगाची वाढ व त्याचा दर्जा, शासनाचे कार्यक्रम, जसे मिडीया लॅब एशिया, विद्या वाहिनी, ज्ञान वाहिनी, सामुहिक माहिती केंद्र इत्यादी. माहिती तंत्रज्ञान उद्योगातील मुलभूत प्रश्न, त्यांचे भवितव्य.

THE TM
YASH ACADEMY

**पेपर क्रमांक - 2**

**सामान्य क्षमता चाचणी व पदाच्या कर्तव्यासाठी आवश्यक ज्ञान : या विषयामध्ये खालील घटक / उपघटकांचा समावेश असेल.**

1 **बुद्धीमत्ता चाचणी**

2 **महाराष्ट्राचा भूगोल -** महाराष्ट्राचा रचनात्मक (Physical) भूगोल, मुख्य रचनात्मक (Physiographic) विभाग, हवामान (Climate), पर्जन्यातील विभागवार बदल, नद्या, पर्वत, डोंगर, राजकीय विभाग, प्रशासकीय विभाग, नैसर्गिक संपत्ती - वने व खनिजे, मानवी व सामजिक भूगोल - लोकसंख्या (Population), Migration of Population व त्याचे Source आणि Destination वरील परिणाम, ग्रामीण वस्त्या व तांडे, झोपडपट्या व त्यांचे प्रश्र, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान.

3 **महाराष्ट्राचा इतिहास -** सामाजिक व आर्थिक जागृती (1885 - 1947), महत्वाच्या व्यक्तींचे काम, स्वातंत्र्यपूर्व भारतातील सामाजिक जागृतीतील वर्तमानपत्रे व शिक्षणाचा परिणाम/भाग, स्वातंत्र्यपूर्व काळातील इतर समकालीन चळवळी, राष्ट्रीय चळवळी.

4 **भारतीय राज्यघटना -** घटना कशी तयार झाली आणि घटनेच्या प्रस्तावनेमागची भूमिका व तत्वे, घटनेची महत्वाची कलमे / ठळक वैशिष्ट्ये, केंद्र व राज्य संबंध, निधर्मी राज्य, मूलभूत हक्क व कर्तव्ये, राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे -शिक्षण, युनिफॉर्म सिव्हील कोड, स्वतंत्र न्यायपालिका.

5 **मानवी हक्क व जबाबदाऱ्या** – संकल्पना - आंतरराष्ट्रीय मानवी हक्क मानक, त्यासंदर्भातील भारतीय राज्यघटनेतील तरतूद, भारतातील मानवी हक्क व जबाबदाऱ्या यंत्रणेची अंमलबजावणी व संरक्षण, भारतातील मानवी हक्क चळवळ, मानवी हक्कापासून वंचित राहण्याच्या समस्या, गरीबी, निरक्षरता, बेकारी, सामाजिक - सांस्कृतिक - धार्मिक प्रथा यासारख्या अडचणी, (हिंसाचार, भ्रष्टाचार, दहशतवाद, कामगारांचे शोषण, संरक्षित गुन्हेगारी, इत्यादी.) लोकशाही व्यवस्थेतील एकमेकांचे हक्क आणि मानवी प्रतिष्ठा व एकतेचा आदर करण्यासंबंधी प्रशिक्षणाची गरज व महत्व, नागरी हक्क संरक्षण अधिनियम 1955, मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम 2005, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचारास प्रतिबंध) अधिनियम1989, हुंडाबंदी अधिनियम 1961, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान.

6 **मुंबई पोलीस अधिनियम, 1951** (Maharashtra Police Act)

7 **भारतीय दंड संहिता, 1860** (Indian Penal Code)

8 **फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973** (Criminal Procedure Code)

9 **भारतीय पुरावा अधिनियम, 1872** (Indian Evidence Act.)

| पोलीस उपनिरीक्षक मुख्य परीक्षा (पेपर – 2)<br>PAPER ANALYSIS - SUBJECTWISE | |
|---|---|
| विषय | वर्ष (2017) |
| चालू घडामोडी व इतर घटक [CURRENT AFFAIRS] | 10 |
| बुद्धीमत्ता चाचणी [REASONING] | 10 |
| भूगोल [GEOGRAPHY] | 05 |
| इतिहास [HISTORY] | 05 |
| भारतीय राज्यघटना [INDIAN POLITY] | 10 |
| माहिती अधिकार अधिनियम - 2005 [RTI ACT -2005] | 05 |
| संगणक व माहिती तंत्रज्ञान [COMPUTER & IT] | 10 |
| मानवी हक्क व जबाबदाऱ्या [HUMAN RIGHTS & RESPONBILITIES] | 20 |
| मुंबई पोलीस कायदा [MUMBAI POLICE ACT] | 10 |
| भारतीय दंड संहिता [INDIAN PENAL CODE] | 05 |
| फौजदारी प्रक्रिया संहिता - 1973 [CRIMINAL PROCEDURE CODE-1973] | 06 |
| भारतीय पुरावा कायदा [INDIAN EVIDENCE ACT] | 04 |
| | 100 |

* 2017 च्या बदलेल्या अभ्यासक्रमानुसार, चालू घडामोडी, माहिती अधिकार अधिनियम - 2005 व संगणक व माहिती तंत्रज्ञान हे घटक पेपर क्रमांक 1 मध्ये समाविष्ट केले आहे.

# पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परीक्षा - २०१७

| | | |
|---|---|---|
| परीक्षा दिनांक : 05/11/2017<br>वेळ : 2 तास | सामान्य अध्ययन - पेपर २ | एकुण प्रश्न : 100<br>एकुण गुण : 100 |

## चालू घडामोडी व इतर घटक

1. 'ब्रिक्स' (BRICS) च्या नव विकास बँकेबाबत (New Development Bank) खालीलपैकी कोणते विधान सत्य आहे ?
   1) ती, सध्या अस्तित्वात असलेल्या अमेरिकेच्या वर्चस्वाखालील जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीला पर्याय म्हणुन कार्य करते.
   2) नव विकास बँकेत प्रत्येक सहभागी देशाला त्याच्या भांडवली हिश्याच्या आधारावर मते निश्चित केले जातात.
   3) केवळ दोन सदस्य देशांना - चीन व रशियास नकाराधिकाराचा अधिकार आहे.
   4) बँकेचे नवी दिल्ली येथे देखील विभागीय कार्यालय आहे.

---

2. ज्यांचे नुकतेच निधन झाले त्या न्यायमूर्ती पी.एन. भगवती यांच्या संबंधी खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे ?
   1) ते भारताचे 17 वे मुख्य न्यायमूर्ती होते.
   2) ते बॉम्बे उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती होते.
   3) ते जनहित याचिका संकल्पनेचे आद्य प्रवर्तक समजले जातात.
   4) वरीलपैकी एकही नाही

---

3. सामरिक सहकार्यासाठी 'लेमोआ' करार कोणत्या दोन देशांच्या दरम्यान झाला ?
   1) चीन व अमेरिका 2) भारत व अमेरिका 3) रशिया व चीन 4) भारत व रशिया

---

4. खालीलपैकी कोणते विधान चूकीचे आहे ?
   1) कोंकणी लेखक महाबळेश्वर सैल यांना त्यांच्या 'हावटण' या कांदबरीसाठी 2016 चा 'सरस्वती सन्मान' मिळाला आहे.
   2) त्यांना 1993 साली 'तरंगा' या लघुकथा संग्रहासाठी 'साहित्य अकादमी' पुरस्कार देखील मिळालेला आहे.
   3) त्यांनी 1964-65 साली युनोचे शांतीदूत म्हणून देखील इस्त्रायल-इजिप्त सीमेवर सेवा केलेली आहे.
   4) वरीलपैकी एकही नाही

THE YASH ACADEMY TM

---

5. 2017 च्या 'वरिष्ठ पेन्शन विमा योजनेची' अंमलबजावणी कोणत्या विमा कंपनी मार्फत होत आहे ?
   1) आय. सी. आय. सी. आय. प्रुडेन्शियल जीवन विमा 2) एल.आय.सी. ऑफ इंडिया
   3) न्यु इंडिया अशुरन्स 4) एच.डी.एफ.सी. स्टँडर्ड जीवन विमा

---

6. जोडया लावा - (डॉ ए.पी.जे अब्दूल कलाम)

| | |
|---|---|
| अ. पद्म विभूषण पुरस्कार | 1. 2000 |
| ब. रामानुजम पुरस्कार | 2. 1997 |
| क. भारत रत्न पुरस्कार | 3. 2014 |
| ड. डॉ. ऑफ सायन्स | 4. 1990 |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 4 | 1 | 2 | 3 |
| 3) | 3 | 1 | 2 | 4 |
| 4) | 1 | 4 | 3 | 2 |

---

7. पॅरालिम्पिक 2016 च्या भाला फेक मध्ये सुवर्ण पदक कोणी प्राप्त केले ?
1) थंगवेलू मरियप्पन 2) वरूण भाटिया 3) दिपा मलिक 4) देवेन्द्र झाझंरिया

8. मुंबई येथे 21 नोव्हेंबर 2016 रोजी संरक्षण मंत्र्यांच्या हस्ते कोणती विनाशिका भारतीय नौदलात दाखल करण्यात आली ?
1) आय एन एस - कोलकाता 2) आय एन एस - मुंबई 3) आय एन एस - चेन्नई 4) यापैकी एकही नाही

9. 2017 च्या कुष्ठरोग विरोधी दिनी केन्द्र शासनाने कोणते राष्ट्रीय कुष्ठरोग जागरूकता अभियान आयोजित केले ?
1) समर्थ अभियान 2) साथ अभियान 3) स्पर्श अभियान 4) संदेश अभियान

10. 'सायबर सुरक्षा निर्देशांक - 2017' बाबत खालीलपैकी कोणते विधान चूकीचे आहे ?
1) सदरहू निर्देशांक हा युनोच्या 'आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघ (ITU) या एजन्सी द्वारा प्रकाशित केला जातो.
2) आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाचे मुख्यालय पॅरीस, फ्रान्स मध्ये आहे.
3) 165 राष्ट्रांमध्ये भारत 23 व्या स्थानी आहे.
4) या निर्देशांकामध्ये सिंगापूर सर्वोच्च स्थानी आहे.

## बुद्धीमत्ता चाचणी

11. शाळेत एक पक्षी निरीक्षकांचे, दुसरे स्टँप गोळा करणाऱ्यांचे आणि एक पुस्तके वाचणाऱ्यांचे अशी तीन मंडळे आहेत. त्यांचे अनुक्रमे 47, 53 व 68 सदस्य आहेत. 13 विद्यार्थी या सर्व मंडळांचे सदस्य आहेत आणि 77 जण फक्त एकाच मंडळाचे सदस्य आहेत. फक्त दोन मंडळाचे सदस्य असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या निवडा.
1) पुरेशा सामग्रीच्या अभावी संख्या निश्चित करता येत नाही.
2) 52 3) 26 4) 24

12. जर $2^{256}$ ला 17 ने भागले तर बाकी शोधा.
1) 1 2) 2 3) 3 4) 5

13. जर a + b ही c + d पेक्षा लहान आहे आणि d + e ही a + b पेक्षा लहान आहे तर e च्या संदर्भातील सत्य पर्याय निवडा.
1) d पेक्षा लहान 2) c पेक्षा लहान 3) c शी समान 4) d शी समान

14. एका सांकेतिक भाषेत जर WELL = 26, व RIVER = 36 असे लिहीत असल्यास, OCEAN = ?
1) 42 2) 27 3) 22 4) 19

15. दुपारी दोन वाजून 25 मिनिटांनी घडयाळातील तासकाटा व मिनिटकाटा यात किती अंशाचा कोण असेल ?
1) $90^0$ 2) $87.5^0$ 3) $82.5^0$ 4) $77.5^0$

16. x कागदाच्या तुकडयाची समभुज त्रिकोण मिळवण्यासाठी बाणांनी दाखवल्यानुसार घडी घातली आणि नंतर त्या त्रिकोणाची तुटक रेषेवरून घडी घालून काटकोन त्रिकोन मिळवला. त्याला विविध आकारांनी दाखवल्यानुसार छिद्रे, पाडली. हा कागद उलगडल्यानंतर दिसणारी प्रतिमा निवडा.




पर्यायी उत्तरे : ANS 2




---

17. P, Q, R, S, T व U हे सहा कुटुंब सदस्य सुट्टीची मौज लुटण्यासाठी जमले आहेत. U ही T व्यक्तीची बहीण आहे जिचा P हा भाऊ आहे. R हा P च्या काकाचा किंवा मामाचा एकुलता एक मुलगा आहे, ज्याची एकमेव बहीण ही U ची आई आहे. R च्या वडीलांचा भाऊ आहे ज्याला Q व S या मुली आहेत. या माहितीच्या संदर्भात सत्य विधान/ने निवडा.

विधाने :

1) S ही P ची चुलत किंवा मामे बहीण आहे.
2) सर्व सदस्यांचे पालक ही भावंडे आहेत.
3) T ही व्यक्ती निश्चितपणे कुटुंबाचा पुरूष सदस्य आहे.
4) Q व U या परस्परांच्या मामे वा आते बहिणी आहेत.

---

18. खालील मालिकेत प्रश्नचिन्हाच्या जागी कोणती संख्या येईल ?

2, 30, 6, 20, 12, 12 ?

1) 20 2) 22 3) 24 4) 26

TM YASH ACADEMY

---

19. दिलेल्या विधानांच्या सहाय्याने योग्य निष्कर्ष शोधा.

अ. काही खुर्च्या बाकडे आहेत. ब. कोणताही बाकडा टेबल नाही.

निष्कर्ष :

1. काही खुर्च्या टेबले आहेत. 2. काही बाकडे खुर्च्या आहेत. 3. सर्व बाकडे खुर्च्या आहेत. 4. काही टेबले खुर्च्या आहेत.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त 1 2) फक्त 2 3) फक्त 2 आणि 4 4) सर्व

---

20. बसथांब्यावरून पुण्याला जाणारी राज्य परिवहन मंडळाची बस दर तीस मिनिटांनी सुटते. नेटवर शोध घेउन नितूला समजले की बस बारा मिनिटांपूर्वीच निघाली आहे आणि पुढची बस सकाळी 7.35 ला सुटणार आहे. नितूला नेटवरून जेव्हा माहिती मिळाली ती सकाळची वेळ निवडा.

1) 6.53 2) 7.12 3) 7.17 4) 6.48

---

## भुगोल

21. भौगोलिक क्षेत्रफळाप्रमाणे खालील जिल्ह्यांचा चढता क्रम लावा.

अ. धुळे ब. जळगाव क. अमरावती ड. नागपूर इ. लातूर

पर्यायी उत्तरे :

1) अ, इ, ब, क, ड 2) इ, अ, ड, ब, क 3) ब, इ, अ, क, ड 4) ड, क, इ, ब, अ

22. जोडया लावा :

| शिखर | उंची (मी.) |
|---|---|
| अ. राजगड | 1. 1376 |
| ब. शिंगी | 2. 1293 |
| क. त्र्यंबकेश्वर | 3. 1304 |
| ड. तोरणा | 4. 1404 |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 1 | 3 | 4 |
| 2) | 4 | 2 | 1 | 3 |
| 3) | 1 | 2 | 3 | 4 |
| 4) | 4 | 3 | 2 | 1 |

23. ढाकणा-कोलकाझ अभयारण्य कोणत्या जिल्हयात आहे ?
1) अमरावती 2) बुलढाणा 3) जळगाव 4) भंडारा

24. जनगणना 2001 प्रमाणे महाराष्ट्र राज्यामध्ये किती जिल्हे व तालुके होते ?
1) 35 जिल्हे आणि 357 तालुके 2) 35 जिल्हे आणि 356 तालुके
3) 36 जिल्हे आणि 358 तालुके 4) 37 जिल्हे आणि 357 तालुके

25. खालील विधाने पहा.
अ. कण्हेर जलसिंचन योजना सातारा जिल्ह्यामध्ये आहे.
ब. कोल्हापूर जिल्हयात 80 टक्के जलसिंचन हे उपसा प्रकारचे आहे.
क. गोंदिया, गडचिरोली, चंद्रपूर जिल्ह्यात 80 टक्के जलसिंचन तलावातून येते.
पर्यायी उत्तरे :
1) फक्त विधान अ बरोबर 2) फक्त विधान क बरोबर
3) विधान अ आणि ब बरोबर 4) विधान अ, ब आणि क बरोबर

THE YASH ACADEMY TM

## इतिहास

26. जेव्हा ------- यांना नाशिकचा कलेक्टर पेरी याने, ते धर्मशाळेसाठी काय करू शकतात असे विचारले तेव्हा त्यांनी पेरीनां विनंती केली की ही धर्मशाळा गरीब लोकांसाठी आहे, येथे राहण्यासाठी त्यांच्या कडून एक पै देखिल भाडे घेतले जाणार नाही तेव्हा धर्मशाळेवरील कर रद्द करावा.
1) गजानन महाराज 2) गाडगेमहाराज 3) मंचरपुर सावरे गावचे पाटील 4) देवदत्त घाटे

27. जावजी दादाजी चौधरी यांनी 1869 मध्ये मुंबईत --------- छापखाना सुरू केला.
1) बुध्दीसागर 2) ज्ञानसागर 3) कालनिर्णय 4) निर्णयसागर

28. विजोड व्यक्ती ओळखा.
1) बॅरिस्टर जयकर 2) वासुदेव दास्ताने 3) अब्दुल सैफ 4) अण्णासाहेब भोकरकर

29. जोडया जुळवा.
अ. ट्वेल्व्ह स्टार्स 1. डॉ. आठल्ये

ब. सातारा रेव्होल्यूशनरीज — 2. दिनकरशास्त्री कानडे

क. ठाणे ग्रुप — 3. काका नाईक

ड. बेळगाव ग्रुप — 4. गोविंदराव यालगी

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 1 | 3 | 4 | 2 |
| 3) | 2 | 1 | 3 | 4 |
| 4) | 3 | 4 | 2 | 1 |

---

30. --------- शहरातील द अलबर्ट एडवर्ड हॉस्पिटलच्या स्त्रियांच्या विभागाच्या प्रमुख वैद्यम्हणून आनंदीबाई जोशी यांची नेमणूक झाली होती.
1) मुंबई 2) पुणे 3) कोल्हापूर 4) सुरत

---

## भारतीय राज्यघटना

31. खालील विधाने विचारात घ्या :
अ. केन्द्रीय पातळीवर, अंदाज समितीतील सर्व सदस्य फक्त लोकसभेतीलच असतात. या समितीमध्ये राज्यसभेला प्रतिनिधीत्व नसते.
ब. महाराष्ट्र राज्य पातळीवर, अंदाज समितीतील सर्व सदस्य देखील फक्त विधान सभेतीलच असतात. या समितीमध्ये विधान परिषदेला प्रतिनिधित्व नसते.
पर्यायी उत्तरे :
1) विधान अ बरोबर 2) विधान ब बरोबर 3) दोन्ही विधाने बरोबर 4) दोन्ही विधाने चुक

---

32. खालीलपैकी कोणती तरतूद भारतीय राज्यघटनेने आयरीश राज्यघटनेकडून घेतलेली नाही ?
1) मूलभूत अधिकार 2) मार्गदर्शक तत्वे 3) राष्ट्रपतीची निवडणूक पध्दत
4) राज्यसभेवर सदस्यांचे राष्ट्रपतीद्वारे नामनिर्देशन

---

33. राज्यपालांच्या वटहुकुम काढण्याच्या अधिकाराबाबत खालील विधाने विचारात घ्या :
अ. राज्यपालांचा तो स्वेच्छाधीन अधिकार आहे.
ब. ते केवळ मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच वटहुकुम काढु शकतात.
क. ते वटहुकुम कोणत्याही वेळी मागे घेवू शकतात.
ड. काही बाबतीत ते राष्ट्रपतींच्या सुचनांशिवाय वटहुकुम काढू शकत नाहीत.
वरीलपैकी कोणती विधाने बरोबर आहेत ?
1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, क, ड 4) अ, ब, क, ड

---

34. भारतीय राज्यघटनेत नागरिकांची खालीलपैकी कोणती मूलभूत कर्तव्ये नेमून दिली आहेत.
अ. सामाजिक अन्यायापासून दुर्बल घटकांचे संरक्षण करणे.
ब. व्यक्तिगत आणि सामुहिक अशा प्रत्येक क्षेत्रात उच्चतम पातळी गाठणे.
क. सार्वजनिक निवडणूकांमध्ये मतदान करणे.
ड. शास्त्रीय वृत्ती विकसित करणे.
पर्यायी उत्तरे :
1) अ, ब 2) क, ड 3) अ, ब, क 4) ब, ड

---

35. भारताचे स्वातंत्र्य आणि अखंडता टिकवून ठेवण्यासाठी घटनाकारांनी भारतीय संघराज्यात :
अ. केंद्राला अधिक अधिकार दिले आहेत. ब. घटकराज्यांना अधिक अधिकार दिले आहेत.
क. राष्ट्रपतींना अधिक अधिकार दिले आहेत. ड. मुख्यमंत्र्यांना अधिक अधिकार दिले आहेत.

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?

1) अ फक्त 2) फक्त ब 3) ब आणि क 4) क आणि ड

36. खालील विधाने विचारात घ्या :

अ. 'कायदयापुढील समता' ही संकल्पना मुळची अमेरिकन आहे तर 'कायद्याचे समान संरक्षण' ही सकंल्पना ब्रिटीशांकडून घेतली आहे.

ब. 'कायद्याचे अधिराज्य' ज्याचा अंतर्गत अनुच्छेद 14 मध्ये आहे ते राज्यघटनेचे 'पायाभुत वैशिष्टय' असून ते घटनादुरूस्तीद्वारे देखील नष्ट करता येणार नाही.

क. राजदूत, याच्यासह परदेशस्थ यांना फौजदारी व दिवाणी कारवाईपासून संरक्षण दिलेले आहे.

वरीलपैकी कोणते विधान/ने बरोबर आहे/त ?

1) अ, ब 2) ब, क 3) फक्त ब 4) वरील सर्व

37. खालील विधाने विचारात घ्या :

अ. केन्द्र आणि राज्ये यामधील कायदेविषयक संबंध राज्य-घटनेच्या अकराव्या भागातील अनुच्छेद 245 ते 255 मध्ये सांगितलेले आहेत.

ब. केन्द्र आणि राज्ये यामधील आर्थिक संबंध राज्यघटनेच्या अकराव्या भागातील अनुच्छेद 256 ते 263 मध्ये सांगितलेले आहेत.

क. केन्द्र आणि राज्ये यामधील प्रशासकीय संबंध राज्यघटनेच्या बाराव्या भागातील अनुच्छेद 268 ते 293 मध्ये सांगितलेले आहेत.

पर्यायी उत्तरे :

1) फक्त विधान अ बरोबर 2) अ आणि ब बरोबर 3) अ, ब आणि क बरोबर 4) ब आणि क बरोबर

38. राज्यपालांच्या संबंधात मुख्यमंत्र्याची खालीलपैकी कोणती कर्तव्ये समाविष्ट आहेत ?

अ. मंत्रिमंडळाचे सर्व निर्णय राज्यपालांना कळविणे.

ब. घटनात्मक तरतूदीनुसार राज्याचे सरकार काम करीत नाही अशी राष्ट्रपतीकडे शिफारस करण्याचा राज्यपालांना सल्ला देणे.

क. राज्याच्या प्रशासना संबंधी राज्यपाल जी माहिती मागतील ती राज्यपालास पुरविणे

ड. राज्य शासनामध्ये नियुक्त्या करतांना राज्यपालास सल्ला देणे.

पर्यायी उत्तरे :

1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, क, ड 4) अ, ब, क, ड

THE YASH ACADEMY TM

39. भारत हे 'गणराज्य' आहे. याचा अर्थ :

अ. येथे लोकशाही आहे. ब. राष्ट्रप्रमुख (राष्ट्रपती) लोकांनी अप्रत्यक्षरित्या निवडून दिलेला असतो.

क. येथे संसदीय पध्दती आहे. ड. पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ लोकांनी निवडून दिलेले असते .

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहेत ?

1) फक्त अ 2) अ व ब 3) फक्त ब 4) क व ड फक्त

40. सर्वोच्च न्यायालयाचे स्वातंत्र्य खालील मुद्यांद्वारे अधोरेखित होते :

अ. अवमान झाल्यास दंड देण्याचा अधिकार

ब. न्यायालयाच्या कर्मचारी, वर्गाची भरती व नियुक्ती

क. कार्यकालाची सुरक्षितता.

ड. न्यायाधिशांची नियुक्ती व पदच्युती संबंधी संविधानिक तरतुदी

पर्यायी उत्तरे :

1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, ब, ड 4) वरील सर्व

## माहिती अधिकार अधिनियम - 2005

41. राज्य माहिती आयुक्त आपले पद ग्रहण करण्यापूर्वी कुणासमक्ष शपथ किंवा प्रतिज्ञा घेईल ?

1) भारताचे राष्ट्रपती 2) राज्यपाल किंवा त्यांनी नियुक्त केलेला त्यांचा प्रतिनिधी

3) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश 4) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधिश

42. माहिती अधिकाराच्या कायद्याअंतर्गत तक्रारी संबंधात चौकशी करताना केंद्रिय माहिती आयोगास --------- च्या सारखे अधिकार आहेत.
1) सर्वोच्च न्यायालय 2) उच्च न्यायालय 3) फौजदारी न्यायालय 4) दिवाणी न्यायालय

43. केंद्रीय माहिती आयोग पुढील व्यक्तिंचा मिळून बनलेला असतो :
अ. मुख्य माहिती आयुक्त ब. आवश्यक वाटतील त्याप्रमाणे पाचपेक्षा अधिक नसतील इतके केंद्रिय माहिती आयुक्त
ब. आवश्यक वाटतील त्याप्रमाणे दहापेक्षा अधिक नसतील इतके केंद्रिय माहिती आयुक्त
ड. उच्च न्यायालयाचे न्यायमुर्ती
वरीलपैकी कोणते विधान/ विधाने बरोबर आहेत ?
1) अ आणि ड 2) अ आणि ब 3) अ आणि क 4) ब आणि ड

44. माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत एकूण किती वेळा अपिल करता येतात ?
1) एकदा 2) दोनदा 3) तीनदा 4) अनिश्चित वेळा

45. माहिती अधिकार कायदा 2005 च्या तरतूदीनुसार प्रत्येक माहिती आयुक्तांचा पदावधी किती निश्चित केला आहे ?
1) ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकापासून पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत
2) त्याच्या वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण होईपर्यंत
3) ज्या दिनांकास आपले पद धारण करील त्या दिनांकपासून पाच वर्षाच्या कालावधीपर्यंत किंवा त्याच्या वयाची पासष्ठ वर्षे पूर्ण होईपर्यंत यापैकी अगोदर घडेल तोपर्यंत
4) वरीलपैकी एकही नाही

## संगणक व माहिती तंत्रज्ञान

46. संगणक परीभाषेच्या संदर्भात वापरल्या जाणाऱ्या 'शॉर्टकट' या शब्दाचा नेमका अर्थ काय होतो ?
1)लवकर संपणारा प्रोग्रॅम 2) प्रोग्रॅममधील जवळचा मार्ग
3) विशिष्ट कळ दाबून दिलेली सूचना 4) वरीलपैकी नाही

47. संगणक परीभाषेत वापरल्या जाणाऱ्या जी.यू.आय (GUI) हया संबोधनाचे पूर्ण रूप कोणते ?
1) जनरल यूजर इंटरफेस 2) जनरल युजर इंटीग्रेशन 3) ग्राफीकल युजर इंटरफेस 4) ग्राफीक यूजर इंटीग्रेशन

48. संगणक टेलीफोनलाइनला जोडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या उपकरणाला खालील पैकी काय म्हणतात ?
1) मोडेम 2) माउस 3) स्पीकर 4) वरीलपैकी नाही

49. विंडोज या ऑपरेटींग सिस्टीम च्या संबंधाने वापरण्यात येणाऱ्या मेनू या शब्दाचा नेमका अर्थ काय होतो ?
1) निवडण्याजोग्या पर्याय वा कृतीची यादी 2) ऑर्डर केलेल्या वस्तू
3) ऑर्डर करावयासाठी उपलब्ध वस्तू 4) वरीलपैकी कोणतेही नाही

50. डिपार्टमेंट ऑफ ॲडमिनिस्ट्रेटीव रिफॉर्मस ॲण्ड पब्लीक ग्रीव्हनसेस ने ऑनलाईन तक्रार करण्याकरता किंवा त्यांचे स्टेटस बघण्याकरता जी मॉनेटरींग सिस्टीम सुरू केली तिचे नाव ---------- आहे.
1) ई - ग्रीव्हन्स 2) सी. पी. जी. आर.ए.एम.एस (सीपीग्रामस)
3) एन. सी. टी 4) टेल-ग्रीव्हनस

51. विंडोज ऑपरेटींग सिस्टीमच्या स्क्रिन वर खालच्या बाजूस दिसणाऱ्या पट्टीला काय म्हणतात ?
1) मेनू बार 2) टूल बार 3) टास्क बार 4) वरीलपैकी कोणतेही नाही

52. मिडीया लॅब एशीयाची बहुभाषीय कम्युनिकेशन सिस्टीम ज्याचा उपयोग अंपग व्यक्तींना होतो ती या पैकी एक आहे :
1) पी @ जी 2) इ-सागू 3) सनयोग (संयोग) 4) इ-मंत्रा

53. सीडॅक चा एन @ जी हया प्रोजेक्टचा उद्देश खालील पैकी आहे :
1) जग आणि देशाची ग्रोथ प्रोजेक्ट 2) नॅशनल जिओग्राफीकल प्रोजेक्ट
3) नॅशनल जी. पी. एस. प्रोजेक्ट 4) नेटवर्क सिक्यूरीटी व इंट्रयुडर शोधणारा प्रोजेक्ट

54. मिनिस्ट्री ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इनफोर्मेशन टेक्नोलॉजी ने भारतातील होणाऱ्या इ-गव्हर्नंस व्यवहारांना मोजण्यासाठी रिअल टाईम पोर्टलचे नाव ---------
1) इ - ताल (इ.टी.ए.ए.एल.) 2) इ-मेजर 3) इ-ट्रांजॅक्शन 4) इ-बिझनेस

55. मिनिस्ट्री ऑफ इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी चे (जीआय) क्लाऊड कंप्यूटींग वर आधारीत प्रोजेक्टचे नाव खालीलपैकी कोणते ?
1) क्लाऊड कींग 2) मेघ राज
3) एम इ आय टी वाय क्लाऊड 4) सी एस पी क्लाऊड

## मानवी हक्क व जबाबदाऱ्या

56. भारतीय राज्य घटनेच्या कलम ------- मधील तरतुदीनुसार, मानवी वाहतूक आणि भिक्षेगीरी किंवा या सारखी कोणतीही सक्तीची मजूरी हे मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे, व शिक्षेस पात्र असेल.
1) 21 2) 22 3) 23 4) 24

57. कौटुंबिक हिंसाचार अधिनियमाचा खालील कलमात वैद्यकीय सुविधा मागता येतात :
1) 6 2) 7 3) 8 4) 9

58. कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंध अधिनियमानुसार दोन्ही पक्षांचे ऐकून, कौटुंबिक हिंसा झाली असल्याचे न्यायाधीशांना समाधान झाल्यास ते पिडित व्यक्तिच्या -------- साठी व जाब देणाऱ्यास कोणतीही कौटुंबिक हिंसा करण्याचे प्रतिबंधाचे आदेश देऊ शकतात.
1) संरक्षण 2) प्रतिबंध 3) सहाय्य 4) सूट

59. कौटुंबिक हिंसाचार पासून महिलांचे संरक्षण अधिनियम, 2005 नुसार जर संरक्षण अधिकारी आपले कर्तव्य पार पाडू शकले नाही तर त्यास तुरूंगवासाची एक वर्षाची शिक्षा व रू.------- असे दंड होईल.
1) 10,000 2) 20,000 3) 30,000 4) 40,000

60. हुंडा प्रतिबंध कायदा, 1961 च्या कलम 8-ब नुसार हुंडा घेणे किंवा घेण्यास प्रवृत्त किंवा मागणी करणे या घटना रोखण्यासाठी राज्य शासन ----------- ची नेमणूक करू शकते.
1) हुंडा प्रतिबंध पथक 2) हुंडा प्रतिबंध अधिकारी 3) हुंडा प्रतिबंध कक्ष 4) हुंडयाच्या खटल्यासाठी विशेष न्यायालय

61. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा, 1989 च्या कलम -------- अनुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना अत्याचारी वागणूक मिळू शकते, अशा जागा ओळखून त्यांना सुरक्षेची हमी देणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

1) 20　　2) 21　　3) 22　　4) 23

62. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे ?
अ. विवाह प्रित्यार्थ मोबदला म्हणून प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे दिलेली संपत्ती किंवा मौल्यवान रोखे म्हणजे हुंडा.
ब. ज्या व्यक्तींना शरियत कायदा लागू आहे त्या प्रमाणे डावर किंवा मेहर यांचा हुंडयात समावेश होत नाही.
पर्यायी उत्तरे :
1) दोन्ही बरोबर आहेत　　2) फक्त अ बरोबर　　3) फक्त ब बरोबर　　4) दोन्ही चूक आहेत

63. पुढील दिवस हा 'मानवी हक्क दिन' म्हणून साजरा होतो :
1) 26 नोव्हेंबर　　2) 10 डिसेंबर　　3) 26 जानेवारी　　4) 8 मार्च

64. आरोपीचे मानव अधिकार राज्यघटनेच्या पुढील कलमात संरक्षीत केले आहे :
1) 12　　2) 13　　3) 20　　4) 25

65. नागरी हक्क संरक्षण अधिनियम, 1955 कलम 2 (क)अन्वये, ''नागरी हक्क'' याचा अर्थ, संविधानाच्या -------- द्वारे अस्पृश्यता नष्ट केल्या कारणाने एखाद्या व्यक्तिला उपार्जित होणारा कोणताही हक्क असा आहे.
1) अनुच्छेद 14　　2) अनुच्छेद 24　　3) अनुच्छेद 17　　4) अनुच्छेद 366

66. नागरी हक्क संरक्षण अधिनियमात गुन्हयास साथ देण्यास पुढील शिक्षा आहे:
1) गुन्ह्यास दिलेली शिक्षेएवढी　　2) गुन्हयाचा अर्धी शिक्षेएवढी　　3) अधिनियमात दिलेले नाही　　4) वरीलपैकी नाही

67. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियमात सार्वजनिक अधिकाऱ्याने कर्तव्यात कसुर केल्यास पुढील काळाची शिक्षा होईल :
1) 2 महिने　　2) 4 महिने　　3) 6 महिने　　4) 2 वर्षे

68. मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनाम्यात पुढील कलमात जगण्याचा अधिकार दिलेला आहे :
1) कलम 1　　2) कलम 2　　3) कलम 3　　4) कलम 4

69. स्त्रियांना कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा, 2005 मधील कलम ------- अन्वये मॅजिस्ट्रेटच्या स्वेच्छेने किंवा संबंधित पक्षकाराने तशी मागणी केल्यास सुनावणी कॅमेऱ्यात करणे बाबत तरतूद आहे.
1) 17　　2) 16　　3) 14　　4) 15

70. मानवी हक्क संरक्षण अधिनियम 1993 अन्वये, साक्षीदाराला बोलावून व हजर राहण्यास सक्ति करून शपथेवर तपासणी करण्याचे ---------- चे अधिकार राष्ट्रीय मानव अधिकार आयोगास असते.
1) फौजदारी न्यायालय　　2) दिवाणी न्यायालय　　3) उच्च न्यायालय　　4) सर्वोच्च न्यायालय

71. मानव अधिकार उल्लंघनाची घटना घडल्यानंतर राष्ट्रीय व राज्य मानव अधिकार आयोग ------- या काळाची मुदत संपल्या नंतर त्या घटनेची चौकशी करणार नाही.
1) तीन वर्षे　　2) दोन वर्षे　　3) एक वर्षे　　4) सहा महिने

72. मानवी हक्कांचा वैश्विक जाहिरनामा हा कोणत्या वर्षी करण्यात आला ?
1) 1948　　2) 1945　　3) 1969　　4) 1979

73. कौटुंबिक हिंसाचारा पासून महिलांचे संरक्षण अधिनियम, 2005 खाली 'कौटुंबिक हिंसेच्या' व्याख्येत खालीलपैकी कशाचा समावेश होतो ?

अ. शारीरिक छळ  ब. लैंगिक छळ  क. शाब्दिक व भावनिक छळ  ड. आर्थिक छळ
पर्यायी उत्तरे
1) वरीलपैकी कोणतेही नाही  2) वरीलपैकी सर्व  3) फक्त अ व क  4) फक्त ब व क

74. सार्वजनिक स्थळांवर धूम्रपान केल्यामुळे धूम्रपान न करणाऱ्यांवर होणाऱ्या दुष्परिणामांना अनुसरून सर्वोच्च न्यायालयाने ------- या जनहित याचिकेवर काही निर्देष दिलेले आहेत व सार्वजनिक ठिकाणी धूम्रपानास बंदी केली आहे.
1) शीला बारसे वि. भारतीय संघ  2) मेनका गांधी वि. भारतीय संघ
3) एम. सी. मेहता वि. भारतीय संघ  4) मुरली एस. देवरा वि. भारतीय संघ

75. मानवी हक्क संरक्षण अधिनियमात पुढील न्यायालयास मानवी हक्क न्यायालय संबोधले आहे :
1) उच्च न्यायालय  2) सर्वोच्च न्यायालय  3) सत्र न्यायालय  4) प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी

## मुंबई पोलीस कायदा

76. मुंबई पोलीस कायदा, 1951 मधील खालीलपैकी कोणत्या कलमानुसार भिकारी म्हणुन घोषित केलेल्या विवक्षित व्यक्तिंना घालवून देण्याबाबतची तरतूद दिलेली आहे ?
1) 57  2) 57(1)अ (ii)  3) 57 (क)  4) 57 अ

77. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 मधील कलम ------- नुसार प्रत्येक पोलीस अधिकारी सार्वजनिक जागेत प्रवेश झडती घेवू शकतो.
1) 67  2) 75  3) 65  4) 69

78. मुंबई पोलीस कायदा, 1951 मध्ये कलम 33अ कि, जे खाद्यपदार्थ, परमीट रूम किंवा बिअर बार यांमधील नृत्यविष्कारावरील बंदी आणि परिणामरूप तरतुदीसाठी खालीलपैकी कोणत्या साली दुरूस्ती करून समाविष्ट करण्यात आले ?
1) सन 2004  2) सन 2005  3) सन 2008  4) सन 2009

79. मुंबई पोलीस कायदा, 1951 च्या कलम 7 नुसार खालीलपैकी कोणते वाक्य चूक आहे ?
1) राज्य शासन आयुक्तांची नेमणूक करते.
2) आयुक्त आपली कार्ये, कर्तव्ये किंवा जबाबदाऱ्या महासंचालक व महानिरीक्षक यांच्या नियंत्रणास अधीन राहून वापरतात.
3) आयुक्त जिल्हा दंडाधिकारी किंवा अधीक्षकांच्या प्रभावाखाली असतात.
4) या कायद्यान्वये किंवा राज्य शासनाच्या निर्देशित केल्यानुसार आयुक्त अधिकाराचा वापर करतात.

80. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 मधील कोणत्या कलमामध्ये रेल्वे पोलीसांची नेमणूक नमूद केली आहे ?
1) 22-अ  2) 24  3) 21 ब  4) 23

81. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 मधील कलम 35 मध्ये केलेली तरतूद ------- संबंधित आहे.
1) प्रेताचे दहन, दफन इतरत्र जागी करणे (प्रतिबंधित जागा सोडून) नियम करणे संबंधी.
2) गायन-वादन, आवाज गोंगाट मनाई करणे.
3) रस्त्यावर अडथळे उभारणे, वाहतूक वाहने थांबविणे.
4) आयुक्त जिल्हा निरिक्षकांना व इतर अधिकाऱ्यास जनतेस आदेश देण्याचे अधिकार.

82. मुंबई पोलीस अधिनियमाअंतर्गत वरिष्ठ ते कनिष्ठ हुद्याप्रमाणे क्रम लावा :
अ. पोलीस नाईक  ब. पोलीस हवालदार  क. पोलीस जमादार  ड. पोलीस शिपाई
पर्यायी उत्तरे :
1) ब, अ, क, ड  2) अ, ब, क, ड  3) क, ब, अ, ड  4) अ, क, ब, ड

83. मुंबई पोलीस अधिनियम कलम, 1951 ------ अन्वये राज्य शासनाला ज्या क्षेत्रात त्याच्या मते, असा बेकायदेशीर जमाव जमला होता ते क्षेत्र (यात यापूढे अशांत क्षेत्र असे संबोधण्याचा) अधिकार आहे.

1) 51 (1)अ 2) 50 3) 51 (3) 4) 51(1)ब

84. मुंबई पोलीस कायदा 1951 नुसार जोडया लावा :

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ. 103 | 1. लोकांसमोर असभ्य वर्तन करणे |
| ब. 105 | 2. पायवाट अडवणे |
| क. 110 | 3. रस्त्यावर किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागी किंवा त्या जागेजवळ क्षोभक कृत्य करणे |
| ड. 112 | 4. शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने गैर वर्तन करणे |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 3 | 1 | 4 |
| 2) | 2 | 3 | 4 | 1 |
| 3) | 2 | 4 | 3 | 1 |
| 4) | 2 | 4 | 1 | 3 |

85. मुंबई पोलीस अधिनियम, 1951 कलम 2(11) अन्वये पोलीस अधिकारी या संज्ञेचा अर्थ, या अधिनियमान्वये नेमलेली किंवा नेमली असल्याचे समजण्यात येणारी पोलीस दलातील कोणतीही व्यक्ती असा होतो आणि तीत कलम ------- किंवा -------- अन्वये नेमलेला विशेष पोलीस अधिकारी किंवा अपर पोलीस अधिकारी यांचा समावेश होतो.

1) 24, 26 2) 21, 22 3) 22, 23 4) 24, 25

## भारतीय दंड संहिता

86. भारतीय दंड संहितेच्या कलम 299 व 300 नुसार उत्तर द्या.

'ब' हा चाबकाने 'अ' ला मारण्याचा प्रयत्न करतो पण 'अ'यास मोठी दुखापत होईल अशा रितिने नव्हे. 'अ' हा पिस्तुल काढतो तरीदेखील 'ब' आपला प्रयत्न चालवितो. त्यामुळे चाबकाचा मार चूकविण्याचा दूसरा मार्ग राहिला नाही असे प्रामाणिकपणे समजून 'अ' हा 'ब' वर गोळी झाडतो त्यात 'ब' चा मृत्यू होतो त्यामुळे -------

1)'अ' ने 'ब' चा खून केला आहे.

2) 'अ' ने 'ब' चा सदोष मनुष्यवध मात्र केला आहे.

3) 'अ' ने स्वतःच्या बचावाचा प्रयत्न केल्यामुळे कोणताही गुन्हा केला नाही.

4) वरिलपैकी कोणतेही नाही

87. भारतीय दंड संहिता 1860 कलम 498 अ नुसार विवाहीत स्त्रीचा पती अगर त्याचे नातेवाईक यांनी जर त्या विवाहीत स्त्रीला क्रूर वागणूक दिली तर ------- पावेतो शिक्षा व दंड सांगितला आहे.

1) 2 वर्षे 2) 5 वर्षे 3) 3 वर्षे 4) 7 वर्षे

88. भारतीय दंड संहिता 1860 च्या कलम 24 नूसार जो कोणी एखाद्या व्यक्तीस गैरलाभ व्हावा किंवा एखाद्या व्यक्तिची गैरहानी व्हावी या उद्देशाने कोणतीही गोष्ट करतो, तेव्हा ती गोष्ट -------- करतो असे म्हटले जाते.

1) नकलीकरण 2) कपटीपणाने 3) अप्रामाणिकपणे 4) गैरलाभाने, गैरहानीने

89. भारतीय दंड संहिता, 1860, कलम 231 नुसार जो कोणी कोणतेही नकली नाणे तयार करील, किंवा जाणीवपूर्वक त्याच्या नकलीकरणाच्या प्रक्रियेतील कोणताही भाग पार पाडील, त्याला ------- पर्यंत असू शकेल इतक्या मुदतीची कोणत्याही एका प्रकारची कारावासाची शिक्षा

होईल आणि तो द्रव्यदंडासही पात्र होईल.

1) 7 वर्षे　　2) 5 वर्षे　　3) 3 वर्षे　　4) 2 वर्षे

90. भारतीय दंड संहितेमधील कलम 121 नुसार भारत सरकारविरूध्द युध्द करणे - प्रयत्न करणे किंवा युध्द करण्यास चिथावणी देण्याच्या अपराधाबद्दल खालीलपैकी कोणते विधान चूकीचे आहे ?

1) मृत्युदंडाची शिक्षा किंवा जन्मठेपेची शिक्षा होते.
2) उच्च न्यायालयासमोर खटला चालविला जातो.
3) अजामिनपात्र गुन्हा आहे.
4) आपसात न मिटविता येणारा गुन्हा आहे.

## फौजदारी प्रक्रिया संहिता - 1973

91. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 मधील दंडाधिकाऱ्याकडे फिर्यादी संदर्भात जोडया लावा :

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ. 200 | 1. आदेशिका काढण्याचे लांबणीवर टाकणे |
| ब. 201 | 2. फिर्याद फेटाळणे |
| क. 202 | 3. फिर्यादीची साक्षतपासणी |
| ड. 203 | 4. प्रकरणांची दखल घेण्यास सक्षम नसलेल्या दंडाधिकाऱ्याने अनुसरायची प्रक्रिया |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 3 | 4 | 1 | 2 |
| 2) | 3 | 2 | 4 | 1 |
| 3) | 4 | 3 | 2 | 1 |
| 4) | 4 | 3 | 1 | 2 |

92. फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम 166 अ आणि 166 ब हे दुरूस्ती कायदा, 1990 (1990 चा 1) प्रमाणे समाविष्ट केले हे दिनांक ----------- पासून अंमलात आलेले आहे.

1) 25-3-1993　　2) 19-2-1990　　3) 21-6-1990　　4) 24-8-1990

93. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 2(द) नुसार ''पोलीस अहवाल'' म्हणजे पोलीस अधिकाऱ्याने ------ उप-कलम (2) प्रमाणे न्यायाधीशाकडे पाठविलेला अहवाल होय.

1) कलम 171　　2) कलम 173　　3) कलम 172　　4) कलम 174

94. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 मधील न्यायदानाच्या कामावर परिणाम करणाऱ्या अपराधांबाबतचे उपबंधनाला अनुसरून जोडया लावा.

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ. 342 | 1. अवमानाच्या विवक्षित प्रकरणातील प्रक्रिया |
| ब. 344 | 2. वादखर्चाचा आदेश देण्याचा अधिकार |
| क. 345 | 3. खोटा साक्षीपुरावा देण्याच्या अपराधाबद्दलच्या संपरीक्षेसाठी संक्षिप्त प्रक्रिया |
| ड. 348 | 4. माफीपत्र सादर केल्यावर अपराध्याची विनादोषारोप सुटका |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 4 | 3 | 1 | 2 |
| 2) | 2 | 4 | 3 | 1 |
| 3) | 2 | 3 | 1 | 4 |

4) 1 2 4 3

95. फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 मधील कलम 2 नुसार जोडया लावा.

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ. 2(ख) | 1. अधिसूचनेची व्याख्या |
| ब. 2(ग) | 2. दोषारोपाची व्याख्या |
| क. 2(छ) | 3. दखलपात्र अपराधाची व्याख्या |
| ड. 2(ड) | 4. चौकशीची व्याख्या |

पर्यायी उत्तरे :

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 2 | 3 | 4 | 1 |
| 2) | 2 | 4 | 3 | 1 |
| 3) | 4 | 2 | 1 | 3 |
| 4) | 1 | 2 | 3 | 4 |

96. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम 2 (प) नुसार ''सरकारी अभियोक्ता'' म्हणजे कलम ------- प्रमाणे नेमणूक केलेली कोणतीही व्यक्ती होय आणि त्यात सरकारी अभियोक्ताचे मार्गदर्शनाप्रमाणे कार्य करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे.

1) कलम 20 2) कलम 22 3) कलम 26 4) कलम 24

## भारतीय पुरावा कायदा (Indian Evidence Act.)

97. भारतीय पुरावा कायद्यातील कलम 32 नुसार जोडया लावाः

| कलम | तरतूद |
|---|---|
| अ. 32(1) | 1. जेव्हा अनेक व्यक्ती भाष्य करतात आणि बाबींशी समर्पक भावना किंवा मत व्यक्त करतात. |
| ब. 32(4) | 2. सार्वजनिक हक्क किंवा प्रथा सार्वजनिक किंवा सर्वसाधारण बाबींच्या अस्तित्वाबद्दल व्यक्त केलेले मत |
| क. 32(6) | 3. मृत व्यक्तिने त्याच्या मृत्युला कारणीभूत ठरलेल्या परिस्थितीबद्दलचे व्यक्त केलेले मत. |
| ड. 32(8) | 4. रक्ताच्या विवाहाच्या किंवा दत्तक विधानाच्या संबंधाच्या अस्तित्वाच्या बाबतीत व्यक्त केलेले मत. |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| 1) | 1 | 2 | 3 | 4 |
| 2) | 2 | 1 | 4 | 3 |
| 3) | 3 | 2 | 4 | 1 |
| 4) | 2 | 3 | 1 | 4 |

98. भारतीय पुराव्याच्या कायद्यातील कलम ------- खाली 'निर्णायक पुरावा/प्रमाण' याबाबत व्याख्येचे स्पष्टीकरण दिले आहे.

1) 2 2) 4 3) 6 4) 3

99. भारतीय पुरावा कायद्यातील कलम 106 नुसार उत्तर द्या.

'अ' रेल्वेतून बिनातिकिट प्रवास करीत होता असा त्याच्याविरूध्द दोषारोप होता. त्याच्याजवळ तिकिट होते हे सिध्द करण्याची जबाबदारी -----------

1) 'अ' वरच आहे 2) पोलीसांवर आहे 3) तिकिट तपासणीवर आहे 4) सरकारी वकिलावर आहे

100. भारतीय पुरावा कायद्यातील कलम 30 नुसार उत्तर द्या.

'अ' विरूध्द 'क' च्या खुनाचा खटला चालू होता. 'अ'आणि 'ब' यांनी 'क' चा खून केला हे दर्शविणारा पुरावा होता आणि 'ब' म्हणाला

YASH ACADEMY TM

'अ' आणि मी मिळून 'क' चा खून केला.
सदर 'ब' चे निवेदन न्यायालय ------
1) 'अ' च्या विरोधात विचारात घेणार नाही
2) 'अ' च्या विरोधात विचारात घेईल
3) 'अ' आणि 'ब' च्या विरोधात विचारात घेईल
4) 'ब' च्या विरोधात विचारात घेईल

## ANS KEY - पोलीस उपनिरीक्षक (मुख्य) परिक्षा - 2017 सामान्य अध्ययन - पेपर २

| Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans | Que. | Ans |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1 | 21 | 2 | 41 | 2 | 61 | 2 | 81 | 1 |
| 2. | 2 | 22 | 3 | 42 | 4 | 62 | 1 | 82 | 3 |
| 3. | 2 | 23 | 1 | 43 | 3 | 63 | 2 | 83 | 1 |
| 4. | 4 | 24 | 2 | 44 | 2 | 64 | 3 | 84 | 1 |
| 5. | 2 | 25 | 4 | 45 | 3 | 65 | 3 | 85 | 2 |
| 6 | 2 | 26 | 2 | 46 | 3 | 66 | 1 | 86 | 2 |
| 7 | 4 | 27 | 4 | 47 | 3 | 67 | 3 | 87 | 3 |
| 8 | 3 | 28 | 4 | 48 | 1 | 68 | 3 | 88 | 3 |
| 9 | 3 | 29 | 3 | 49 | 1 | 69 | 2 | 89 | 1 |
| 10 | 2 | 30 | 3 | 50 | 2 | 70 | 2 | 90 | 2 |
| 11 | 2 | 31 | 1 | 51 | 3 | 71 | 3 | 91 | 1 |
| 12 | 1 | 32 | 1 | 52 | 3 | 72 | 1 | 92 | 2 |
| 13 | 2 | 33 | 2 | 53 | 4 | 73 | 2 | 93 | 2 |
| 14 | 4 | 34 | 4 | 54 | 1 | 74 | 4 | 94 | 3 |
| 15 | 4 | 35 | 1 | 55 | 2 | 75 | 3 | 95 | 1 |
| 16 | 2 | 36 | 3 | 56 | 3 | 76 | 4 | 96 | 4 |
| 17 | 2 | 37 | 1 | 57 | 2 | 77 | 3 | 97 | 3 |
| 18 | 1 | 38 | 3 | 58 | 1 | 78 | 2 | 98 | 2 |
| 19 | 2 | 39 | 3 | 59 | 2 | 79 | 3 | 99 | 1 |
| 20 | 3 | 40 | 4 | 60 | 2 | 80 | 1 | 100 | 1 |